ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS

Original Research Article

# खान्देशातील गोर-बंजारा समाजातील अभिनव लग्नप्रथा

* लक्ष्मण महारू राठोड

** डॉ. अनिल शालिक गायकवाड

**अर्थशास्त्र विभाग, ** पदार्थ विज्ञान विभाग, एस पी डी एम कला, एस बी बी व एस एच डी वाणिज्य आणि एस एम ए विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जि. धुळे*

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे आणि हीच विविधता आपल्याला पावलोपावली जाणवत असते. सांस्कृतिक विविधतेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक राज्य आणि राज्यातील भौगोलिक प्रदेशाच्या जडण-घडणीनुसार वेगवेगळी संस्कृती आपल्या अनुभवाला येते. समाज हा विविधांगी जाती आणि जमातीमध्ये विखुरला गेलेला आहे. रूढी-परंपरेनुसार प्रत्येक समाजातील जाती-जमातीची आपापली वेगळी संस्कृती आहे आणि प्रत्येकाचा वेगळा इतिहास आहे. महाराष्ट्र देखील अठरापगड जातींनी समृद्ध केलेला प्रदेश आहे. उत्तर महाराष्ट्रातील सातपुड्याच्या सानिध्यात असलेल्या धुळे, नंदुरबार, जळगाव जिल्हा आणि नाशिक जिल्ह्यातील काही प्रदेश खान्देश म्हणून सर्वदूर परिचित आहे. आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांची मांदियाळी ह्या भूप्रदेशाला म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. शतकानुशतके सदोदित भटकंती करत फिरून आता तांडे वसवून स्थिरस्थावर होणाऱ्या बंजारा समाजातील खान्देशी संस्कृतीला नवा आयाम देणाऱ्या चालीरितींचा हा घेतलेला धुंडाळा होय.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited

भारतातील बंजारा समाजाचे मूळस्थान मुख्यत्वे राजस्थान समजले जाते. व्यापार आणि सततची भटकंती ह्यामुळे राजस्थान येथून खानदेशात बंजारा समाजाने आपले पाऊल टाकले असावे असे मानले जाते. बंजारा समाजाचे आराध्य दैवतामध्ये श्री. रामदेवजी महाराज, रणूजा, राजस्थान, संत श्री. सेवालाल महाराज, पोहरादेवी, महाराष्ट्र, संत श्री. दगाजी बापू, चौपाळे, नंदुरबार, महाराष्ट्र, संत श्री टिलाजी बापू, आबू, राजस्थान इत्यादिचा समावेश होतो. आध्यात्मिक तसेच सामाजिक जाणिवेतून सर्वसामान्य बंजारा समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे महणीय कार्य ह्या संतांनी केलेले आहे. आजही त्यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या ठिकाणी राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाजासोबतच इतर समाजदेखील मोठ्या प्रमाणावर भेट देतात. बंजारा समाजाचा प्राचीन इतिहास पार हड्प्पाकालीन संस्कृतीशी जवळीक सांगणारा आहे असे मत इतिहासकारांनी नोंदवलेले आहे.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

**मारी हरपली याडी (आई)**

**मारी हरपळी बाई (बहीण)**

**मार हरपळ नायकण (पत्नी)**

येथे 'हरपळ' या शब्दाचा बंजारा भाषेत हडप्पा असा अर्थ इतिहासकारांनी सांगितलेला आहे. बंजारा समाज संपूर्ण भारत भर पसरलेला असला तरी देखील त्यांची बोली भाषा राहणीमान संस्कृती परंपरा पोशाख व खानपानात एकसूत्रता दिसून येते. बंजारा समाज आणि अलंकार यांची अत्यंत जवळीक आ ढळून येते. पुरुषांच्या हातात चांदीचा कडा, कानात बाळी व गोखरू इत्यादी आढळून येते. बंजारा समाजातील पुरुष व महिला पारंपारिक पोशाख परिधान करताना दिसून येतात. महिलावर्ग त्यांची वस्त्रे स्वत:च शिवून त्यावर छानपैकी कलाकुसर करून मग ती वस्त्रे ते परिधान करतात. आहाराच्या बाबतीतदेखील राजस्थानातील खाद्यसंस्कृती आणि बंजारा समाजातील आहार यात बरेच साधर्म्य आढळते. भारत भरातील बंजारा समाज आणि खांदेशातील बंजारा समाजातील चालीरीती, बोलीभाषा, राहणीमान, परंपरा, संस्कृती, पेहराव आणि खानपान इत्यादी मध्ये विशेष साम्य आढळून येते.

गोरमाटी म्हणजेच मातीशी नाळ जुळवून, संस्कृती आणि विचारांशी इमान राखून आपले पालावरचे आयुष्य खान्देशातील तांड्यां-तांड्या वर वस्ती करत जगणारा भटका विमुक्त बंजारा समाज आपले वेगळेपण आजही जपून आहे. ऐतिहासिक दस्तावेजनुसार बंजारा समाज व्यापारी वर्गात मोडायचा. 'लवण' म्हणजेच आपल्या खाद्यपदार्थातील मीठ, ह्याची आयात-निर्यात पूर्वी बंजारा लोक करायचे. कदाचित ह्यामुळेच त्यांना 'लमाणी' म्हणून देखील काही भागात ओळखले जाते. मुघलांच्या जाचाला त्रासून ते महाराष्ट्रात आले आणि आपल्या खान्देशातील विविध भागात स्वतंत्रपणे आपापले तांडे उभारून खान्देशी संस्कृतीच्या जडणघडणीत आपला खारीचा वाटा त्यांनी उचलला. नेहमीच्या दळणवळणात आपल्या मातीशी इमान राखत इंग्रजविरोधी कारवाया करण्यास सामील झाले. या इंग्रजविरोधी कारवायांच्या आरोपामुळे बंजारा समाजाला इंग्रजांनी तयार केलेल्या भटक्या विमुक्त गुन्हेगारी जमातीच्या यादीत टाकण्यात आले होते. संपूर्ण भारतभर बंजारा समाज आज पसरलेला आढळून येतो. महाराष्ट्रात बंजारा, पंजाब मध्ये बाजीगर, कर्नाटक मध्ये लमाणी, आंध्र प्रदेशात लंबाडा, उत्तर प्रदेशात नायक तसेच राणी समाज या नावाने देखील हा समाज ओळखला जातो. बंजारा समाजाने बदलत्या काळाबरोबर मार्गक्रमण करीत असताना आपल्या जुना प्रथा परंपरा इत्यादी बाबतीत आजही आपले वेगळेपण टिकून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. कष्टकरी समाज म्हणून परिचित असलेल्या बंजारा समाजाने लदेणी अवस्थेपासून आज पावतो अपार कष्ट उपसलेले आहे. पूर्वीच्या काळी दळणवळणासाठी लागणारे वाहतुकीची संसाधने अस्तित्वात नसताना, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत, जीवाला धोका पत्करून, आपल्या व्यवसायाच्या निमित्ताने मालाची ने-आण करण्यासाठी बंजारा समाज संपूर्ण भारतभर भ्रमण करत होता. युद्ध काळात युद्ध सामग्री वाहून नेणे, वेगवेगळ्या राजकीय सत्तांना रसद पुरवणे, दुष्काळात अन्नधान्याची वाहतूक करणे, यासारखे समाज उपयोगी कार्य बंजारा समाजाने पिढ्यानुपिढ्या केलेले आहे.

बंजारा समाज हा रूढीवादी समाज आहेत. समाजातील रूढी-

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

परंपरा यांचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर विशेष परिणाम झालेला आपल्याला आजही पहायला मिळतो आहे. जन्मापासून तर मृत्यूपर्यंत वेगवेगळ्या चालीरीती आणि जीवनशैलीचा अनुभव आपल्याला बंजारा समाजाच्या अभ्यासातून लक्षात येतो. तांडा किवा वस्तीने राहत असताना प्रत्येक तांड्यासाठी म्हणून एक नायक किंवा पुढारी हा निवडला जात असतो. समाजातील चाली, रूढी, परंपरा ह्यांचे व्यवस्थित पालन होते किवा नाही, आजूबाजूच्या तांड्यापासून संरक्षण, जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार, इत्यादि तांडा नायकाच्या अधिपत्याखाली होत असते. नायकांचा प्रभाव हा संपूर्ण तांड्यावर असतो. नायक आपल्या तांड्याला समृद्ध आणि योग्य मार्गाने घेऊन जाण्यास बांधील असतो. आपल्या कार्यकर्तुत्वामुळे बंजारा तांडा हा नायकाच्या नावानेदेखील ओळखला जातो. खांदेशात देखील बरेच तांडे हे नायकांच्या नावाने आजही ओळखले जातात. उदाहरणार्थ झामा नायकाचा तांडा, कापुसवाडी, हिरा नायकाचा तांडा, देशमुख नायकाचा तांडा, वसंत नगर, पोपट नायकाचा तांडा, पोपट नगर, इत्यादि. खांदेश भागातील बंजारा समाजात होळी, तीज आणि दिवाळी हे मुख्य पारंपरिक उत्सव बंजारा समाज साजरा करत असतो. गोर-बंजारा समाजात बाळ जन्मास आल्यानंतर 'वेकळप' नावाचा पारंपरिक विधी केला जातो. हा विधी फक्त नवजात मुलांसाठीच करण्यात येतो मुलींसाठी आजही हा विधी टाळण्यात येतो. पुरातन काळापासून लग्न प्रथेतील आवश्यक बाब म्हणून लग्नाआधी वधूमूल्य वेगवेगळ्या रूपात देण्याची प्रथा बंजारा समाजात रूढ होती. कालपरत्वे ही संकल्पना आज बदलत असून बंजारा समाजदेखील वाईट चालीरीतीचा त्याग करून समाजाच्या सर्वांगीण विकासाकडे मार्गक्रमण करीत आहे.

लग्नसंस्कार हा प्रत्येकाच्या आयुष्यातील सुवर्णक्षण असतो. बंजारा समाजात देखील ह्याचे वेगळे महत्व आहे. बंजारा विवाह पद्धती एक हिंदू विवाह पद्धतीपैकीच परंतु एक आगळीवेगळी पद्धती आहे. या समाजातील विवाह प्रथेतील पहिली महत्त्वाची बाब म्हणजे वधूमूल्य ही मुख्य प्रथा होय. अजूनही मागास असलेला व फारसा जनप्रवाहात न आलेला बंजारा समुदायात ही प्रथा प्रचलित आहे. यात वर किंवा नवरदेव पित्याला नवरी पक्षाकडून विशिष्ट रक्कम, पशू किंवा वस्तू भेट म्हणून दिली जात असते. सगाई करताना गावातील किंवा तांड्यातील सर्व वरिष्ठ मंडळी ज्यांना शहाणे (नायक) म्हणून संबोधले जाते, त्यांना बोलावून मान सन्मान देऊन आलेल्या प्रमुख अतिथींचा सन्मान करून लग्न जुळवले जातात. दोन अनोळखी कुटुंबामध्ये, वेगवेगळ्या तांड्यामध्ये नातेसंबंध करण्यासाठी नायकाची भूमिका निर्णायक असते. मलाप कींवा लग्नकार्यातील इतर भेटगाठ प्रसंगी समाजबांधव एकमेकांशी ओळख करण्यासाठी, मानसन्मान देत आपले संबध दृढ करण्यासाठी एका विशेष बैठकीचे आयोजन करीत असतात. या प्रत्येक भेटीगाठीसाठी बहुतेक वेळेस मांसाहारी भोजन दिले जात असते, याला बंजारा भाषेत 'मलाप' असे देखील म्हटले जाते. मलाप या शब्दाचा हिंदीभाषेत अर्थ मिलाप म्हणजेच भेटगाठ असा होतो. मलापचे खालील तीन प्रकार आहेत,

- सोळ भाई सगेरी मलाप
- हेतु सगारी (वाङ्निश्चयसाठीचा) मेळमलाप

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

- भाई-पणारी ((भाऊबंदकीची) मेळमलाप

मेळ-मलाप निश्चित केल्यानंतर आजूबाजूच्या सर्व नातेवाईकांना तांड्यातील जाणकार, नायक व पंचांना बोलावून वधूकडील मंडळींची परवानगी घेतली जाते व मांसाहारी किंवा शाकाहारी भोजन दिले जाते. मेळमलापची सुरुवात ही श्लोक म्हणजेच दोहे बोलून केली जात असते.

**बेल चडे उस बीरज पे करे बीरज से प्रीत । प्राण जाय छुटे नही कुल आपणे की रीत ॥**

**कंचन दान सुमेरु है बडो दान गजदान । भांग कसुमल घुगरी पंचुरो सन्मान ॥**

**सगा थे भल आवीयो मोसर करा मलाप । ये सगारे कारणे मारो बकरा हुबो आज ।**

**कजळी बनरा बोकडा बनकी पत्ती खाय । सगा आपणे कारण हमारे घरमे आनंद आय ॥**

**छबा भरी रजपुतरी घमटरहयो दरबार । मीसरी सूतो म्यान से करो बकारपर वार ॥**

**भली रीत रजपूतरी भली कोनी मनवार । भांग कसुमल घुगरी जळ घोटारो सन्मान ॥**

**सगो आवीयो पामणो तमारो कसी करु मनवार । भांग कसुमल घुगरी जळ घोटारो सन्मान ॥**

अशाप्रकारे दोहा बोलून परस्परांना सन्मान देऊन लग्न जुळवली जात असतात. ‘लदेणी’ च्या अवस्थेत एकदा दूरवर व्यवसायाच्या निमित्ताने गेल्यानंतर परत केव्हा भेटगाठ होते याची शाश्वती नसल्यामुळे त्यांची एक आठवण म्हणून खालील दोहा बोलला जात असे,

**पंच्छी चले देशावरा कर-कर दुवा सलाम I अब के बिछडे कब मिलावे राम II**

म्हणजेच बंजारा समाजातील दोन तांडे, दोन कुटुंब भविष्यात लांब गेल्यानंतर ते परत केव्हा भेटतील हे सर्वस्वी ईश्वरी इच्छेवर अवलंबून असायचे. परंतु आता स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर एकमेकांना भेटण्याची शाश्वती झालेली आहे. हयाचीच आठवण म्हणून, बंजारा समाजातील लग्नसमारंभात आजही लग्नाच्या आदल्या दिवशी वरासोबत बंजारा महिला रडतात. याला बंजारा भाषेत ‘ढावलो’ असे म्हणतात. ह्या ढावलो विधिमागील संकल्पना अशी असावी की, वरमुलगा लग्न झाल्यानंतर आईवडिलांना साथ देईल किवा न देईल, हे एक मिथकच आहे. त्यासोबतच पूर्वीच्या काळी भटकंती सुरू झाली की नंतर केव्हा भेटता येईल ह्याची शाश्वती नसल्याने ढावलोच्या निमित्ताने आपल्या भावनांना व अश्रुंना वाट करून दिली जात असते. हयासोबतच, लग्नानंतर जेव्हा वऱ्हाड परत निघून जात असताना त्यावेळेस वधू आपल्या परीवार आणि नातेवाईकसोबत रडते. बंजारा समाजात शिक्षितांची संख्या वाढली आहे, दळणवळणाच्या सुखसोयी उपलब्ध आहेत तरीसुद्धा वरीलप्रमाणे रडण्याची प्रथा बहुतांश प्रमाणात आजही प्रचलित आहे.

जेव्हा नवरदेवाकडील सर्व नातेवाईक आप्तेष्ट वधुपक्षाकडे लग्न लावण्यासाठी जमतात त्यावेळी सुरूवातीला सर्वांना पाणी देऊन प्रत्येकाची ख्याली-खुशाली विचारली जात असते. ह्याला बंजारा भाषेत ‘आपनो भाई सगेर सग’ असे म्हटले जाते. त्यानंतर दोन्ही पक्षातील सदस्य, तरुण मुले एकमेकांना अभिवादन करून जेष्ठांचे आशीर्वाद घेतात. मानसन्मान म्हणून काही संस्कृत श्लोक किंवा कबिराचे दोहे लग्न मंडपात बोलले जातात.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023
OPEN ACCESS Original Research Article

**आवन को आदर करा, चलत नमावा शिष I**

**बैठण कु तकिया देवा, शिष देवा बक्षिश II**

ह्या दोह्याद्वारे कार्यक्रमाला उपस्थिती लावणाऱ्यांचे, नातेवाईकांचे यजमान परिवारातर्फे आदर दर्शवीत वऱ्हाडासोबत असलेल्यापुढे नतमस्तक होतो. सगेरी मलापसाठी जे अतिथिगण बसतील त्या सर्वांसाठी गादी आसन देऊन त्यांच्यासाठी बळीराजाप्रमाणे वेळ पडली तर डोके देखील तुम्हाला बक्षिस म्हणून देऊन टाकू, ह्या शब्दात आलेल्या पाहुण्या मंडळींचा आदर सत्कार केला जातो.

**चार मिलेन चौसट खिले I बीस रहे कर जोड II**

**सग्गा से सग्गा मिले I मिल गये सात करोड II**

**मिले मिलाए मिल रहे I मल रहे चारो नेण II**

**भर-भर बखडी मल रहे I मल रहे सग्गा सेण II**

वरील दोहयात चार मिले म्हणजे दोन्हीचे डोके परस्परांना मिळाले, दोन्ही सगे-सोयरे मनसोक्त हसत आहेत आणि म्हणून त्यांचे चौसष्ट दात आणि चारही डोळे एकमेकांना भेटण्याचा आनंद व्यक्त करीत आहेत. अशा प्रकारे लग्नासाठी आलेल्या अतिथीचे स्वागत केले जाते. आगत स्वागत झाल्यानंतर एकमेकांशी दोहयाच्या रूपात संभाषण सुरू होते. सर्वसाधारणपणे, कार्यक्रमातील दोहे आपली मुलगा-मुलगी सुखी कशी राहील? भविष्यात आपले नातेसंबद्ध सुदृढ कसे राहतील? आपसातील जमेच्या बाजू कोणत्या? इत्यादी गोष्टीवर आधारित असतात.

**1. धोळो घोडो हासलो I खुटी टको लगाम II**

**सगाती सगा मलगे I दस दन करदा मकाम II**

**सगा आछि आछि राख जो I माटी माटी टाळजो II**

**हाम तमारे दरबारेम आये छा I हमारी लाज रखाड जो II**

**हे भाई आपण भाई सगेर सग**

**2. सोऽऽ भाई सग पचारे नामू लागे एकूसे एक सवाय**

**पंच पंचायती छबा राजा भोजरी**

**बेठक सोळे भाई सगेरी**

**सगो तो सरदार भाई माथेरी मोड**

**पचारे हो लाखेर बगर पचारे सव्वा लाखेरो**

**नायक शाणाजी तो वाळो दी टप्पा के छ ?**

**येवा सगाने येवा करीये येवा नंदी नीर**

**धापो धाप सिंह-सिया तो दुणी आवे सीर**

**सुकसुकटा सुपारीया रंग कसुमल होय**

**भाई और सगा बीना रंग दुजो नही होय**

**3. प्रेमी ढुंढत मैं फिरू I प्रेमी मिलेन कोय ।I**

**प्रेमी सो प्रेमी मिले I विष से अमृत होय ।।**

**4. बडे भूप बाजा बाजे इंद्र बाराती साथ I**

**कमर कटारो हात मे भालो पारबती शिवनाथ II**

**बैल सवारी शिवजी आए हेमा जल के द्वार I**

**जौरा-भौरा सिके भरी उणघर आनंद अपार II**

**5. सीया भरो से राम के राम भरोसे हनुमान**

**हाम भरो से आप के नाम जपा दीन रात**

**तुलसी जगमे आय के सबसे मिलीये धाय**

**ना जाणे कोई कोई भेस में नारायण मिल जाय**

**6. डुंगर थे जब दूर थे अब की पडी पचाण**

**टाची लागे प्रेम की उबजे हिरा खाण**

**हिरा-हिरा क्या करे, हिरा जग मे दो**

**एक हिरा समुंदर बसे, एक पंचुरे मायी**

दोहे म्हटल्यानंतर पाहुणेमंडळी लग्नकार्याचे सोपस्कार आटोपून पुढील विधीसाठी तयार होतात. उर्वरित लग्नविधी

हा हिंदू पद्धतीने बंजारा समाजाच्या चालीरीतीनुसार केला जातो.

खांदेशातील बहुतेक भागात आजही समाजाच्या रूढी परंपरा कायम ठेवत बंजारा समाज विकासाची कास धरत मार्गक्रमण करत आहे. समाजकारण, राजकारण आणि उच्चशिक्षणाचा योग्य मेळ साधत आपल्या नवीन पिढीला अस्तित्वाच्या परांपरांना बांधील राहून विकासाच्या प्रवाहात मार्गस्थ होण्यास सहाय्यभूत होत आहे. खांदेशातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या संस्कृतीला पाठबळ देत भटक्या-विमुक्तांच्या अडचणी सोडवण्यास हातभार लावत आहे. अशाप्रकारे बंजारा समाज आजच्या अत्याधुनिक युगात देखील आपले पारंपरिक चालीरीती पाळत, आपला वारसा टिकवून आहेत.

**संदर्भसूची**


- राठोड रा. तु. प्राचीनकालीन गोर बंजारा संस्कृतीचे अध्ययन, रेविव्ह ऑफ रिसर्च जर्नल, 2019
- गोर संस्कृती, साप्ताहिक साथी बंजारा, चाळीसगाव, जळगाव 2015.
- इक्बाल, बंजारा लोकसंस्कृती: एक अवलोकन, इंटरनेशनल जर्नल ऑफ हिंदी रिसर्च, 2017
- गोरबंजारा इतिहास व लोकजीवन, ऋचा प्रकाशन नागपूर 2014
- राठोड क. प्र., बंजारा मूळस्थान, पुणे रिसर्च टाइम्स, 2018
- गणेश चव्हाण, ओस मार बोली, गोरमाटी, महाराष्ट्र टाइम्स दैनिक, 19 ऑगस्ट 2017
- https://sites.google.com/site/banjarathetribeofindia/
- https://www.santsahitya.in/
- https://hi.wikipedia.org/wiki/%E0%A4%AC%E0%A4%82%E0%A4%9C%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%BE


*Cite This Article:*

Rathod L.M. & Gaikwad A.S. (2023). **खान्देशातील गोर-बंजारा समाजातील अभिनव लग्नप्रथा**. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 91–96). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10475369